भु. नि. अर्ज क्र.१८९/२०१८
शामराव – वि – महा. शासन

**निशाणी क्र.३५ वरील आदेश**
**(दि.१०.०३.२०२६ रोजी पारीत)**

. प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांच्या विरुध्द् पारित झालेला प्रकरण खारीज करण्याचा आदेश रद्द करुन प्रकरण पुनरर्जिवीत करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर अर्जदाराने आपले लेखी म्हणणे सादर करून सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.२ यांचे अर्जातील कथन असे की, प्रतिवादी क्र.२ हे सदर दाव्यात समाविष्ट असुन त्यांच्या विरुध्द अर्जदाराने स्टेप्स न घेतल्यामुळे अर्ज खारीज करण्यात आला. प्रतिवादी क्र.२ ने त्यांच्या विरुध्द झालेला आदेश रद्द करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने सदर अर्जावर आक्षेप घेतला असून अर्जाची व लेखी जबाबची पाहणी केली असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ हे महाराष्ट्र शासन अंतर्गत विशेष भु–संपादन अधिकारी पक्षकार

असल्यामुळे सदर दावा प्रतिवादी क्र.२ च्या गैरहजेरीत चालवणे चुकीचे होणार आहे. म्हणुन त्यांच्या विरुध्द प्रकरण खारीज चा आदेश रद्द करून त्यांचे लेखी म्हणणे पटलावर घेणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रतिवादी क्र.२ यांचा नि.क्र.३५ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

ASHVINI PRAVIN DIWAN
Digitally signed by ASHVINI PRAVIN DIWAN
Date: 2026.03.11 17:13:33 +0530

(अश्वीनी प्र. दिवाण)

दि.१०.०३.२०२६ दिवाणी न्यायाधीश(व.स्तर),जालना